स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
**तहसिलदार,उमरेड यांचे कार्यालय,उमरेड**
**तालुका-उमरेड,जिल्हा-नागपूर पिन कोड क्र. 441203**

दुरध्वनी क्र. 07116-242004 Email ID:- tahsilofficeumred@gmail.com

क्र.म.स./तलाठी-आस्था/तह.उम/कोतवाल-भरती/कावि- 129/2023 दिनांक :- 08 जून, 2023

# जाहीरनामा

तहसिल कार्यालय,उमरेड येथे रिक्त असलेली कोतवाल पदे भरणेबाबत जाहीरनामा जाहीरात क्र.-त.आस्था/म.स/तह.उम/कावि- 129/2023 दिनांक 07/06/2023
नागपूर जिल्हयातील उमरेड उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील ( उमरेड तालुका ) साझ्यातील कोतवाल पद भरतीसाठी अहर्ता धारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| 1. | अर्ज भरण्याची कालावधी (कार्यालयीन वेळेत) | 08.06.2023 ते 22.06.2023 (शासकीय सुट्टयाचे दिवस वगळून) |
| 2. | अर्ज भरण्याची अंतिम मुदत | 22.06.2023 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| 3. | पात्र /अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | 25.06.2023 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत |
| 5. | परिक्षेचा दिनांक व वेळ | पुढे कळविण्यात येईल. |
| 6. | अर्ज कुठे उपलब्ध होतील | तहसिल कार्यालय उमरेड (आस्थापना शाखा) |

कोतवाल भरती प्रक्रियेचा सविस्तर जाहिरनामा याद्वारे प्रसिध्द करण्यात येत आहे. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपुर्वक समजून अर्ज सादर करावेत. कोतवाल पदाचे परिक्षेचे अर्ज तहसिल कार्यालय उमरेड येथे स्विकारले जातील. **कोतवाल भरतीचे अर्ज तहसिल कार्यालय उमरेड येथील आस्थापना शाखेत मिळतील.** तरी उमेदवारांनी विहित नमुन्यात दोन पासपोर्ट साईज फोटोसहीत अर्ज आवश्यक कागदपत्रे व पुराव्यासहीत दि. 22.06.2023 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे व त्याबाबत पोच घ्यावी. विहित तारखेनंतर येणा-या व अपूर्ण भरलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
भरती प्रक्रिया, परीक्षा, स्थगित करणे, किंवा रदद करणे; अंशत: बदल करणे, पदाच्या एकुण व आरक्षक प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करणेचे अधिकार तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात बाद तक्रारी बाबत अंतीम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, उमरेड यांनी राखून ठेवलेले असून त्यांचा निर्णय

अंतीम असेल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. भिवापूर तालुक्यातील कोतवालांची मंजूर पदे ,रिक्त पदे तसेच 30 % महिलांसाठी आरक्षित ठेवलेली पदे विचारात घेवून सद्यास्थितीत जी पदे भरणे आवश्यक आहे. त्याबाबतची माहीती खालीलप्रमाणेआहे.

**कोतवाल भरती 2023 साठीचे साजा व त्यांचे क्रमांक.**

| अ.क्र. | कोतवाल पद भरावयाचा साझा क्रं व नाव | अंतर्गत गावे | कोतवाल पद भरावयाची संख्या | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1. | 15 - उटी | 1.उटी<br>2.भिवापूर<br>3.मासलकुंड<br>4.परसोडी<br>5.हळदगांव | (1) | इ.मा.व. (महीला) |
| 2. | 20अ - आपतूर | 1.आपतूर<br>2.ब्रम्ही(रिठी)<br>3.सालई<br>4.सोनपूरी | (1) | आ.द.घ. (महीला) |
| 3. | 27- बोरगांव (लांबट) | 1.बोरगाव (लांबट)<br>2.वडगांव<br>3.किन्हाळा<br>4.कोहळा<br>5.पेंडकापार<br>6.गणेशपूर(रिठी)<br>7.गोवरी (रिठी)<br>8.राखी (रिठी) | (1) | इ.मा.व. |
| 4. | 33 -चनोडा | 1.चनोडा<br>2.इब्राहीमपूर(रिठी)<br>3.नांदरा<br>4.बिडमोहना<br>5.काचलकुही<br>6.चिखलधोकडा<br>7.म्हसाळा | (1) | इ.मा.व. |
| 5. | 34-हिवरा | 1.हिवरा<br>2.सुकळी(जू)<br>3.सेल्लोटी(रिठी) | (1) | अराखीव (खुला) |
| 6. | 20-ब्राम्हणी | 1.ब्राम्हणी<br>2.कोटगाव<br>3.गावसूत<br>4.कुंभापूर(रिठी) | (1) | इ.मा.व. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7. | 23-खुर्सापार(उम) | 1.खुर्सापार<br>2.वाघोली(रिठी)<br>3.धामणगाव(रिठी)<br>4.पांढरतळ(रिठी)<br>5.लोहारा<br>6.आलागोंदी (ज)<br>7.डोंगरगाव<br>8.पिपरडोल<br>9.देवळी<br>10.पांजरेपार (ज) | (1) | इ.मा.व. (महीला) |
| 8. | 12-वडध | 1.वडध<br>2.मटकाझरी<br>3.कच्छीमेट | (1) | इ.मा.व. |
| 9. | 30-सावंगी (बुर्ज) | 1.सावंगी(बुर्ज)<br>2.सिंगोरी<br>3.सायेश्वर<br>4.सावंगी(खुर्द)<br>5.बोरगांव<br>6.बोरीमजरा<br>7.बेलपेठ | (1) | वि.जा. (अ) |
| 10. | 16-सायकी | 1.सायकी<br>2.दहेगाव<br>3.सुकळी(द.रिठी)<br>4.पारडगांव | (1) | अराखीव (खुला) |
| 11. | 24-भिवगड | 1.भिवगड<br>2.मुरझरी<br>3.तांबेखणी(रिठी)<br>4.उमरी (रिठी)<br>5.गरमसूर(रिठी)<br>6.आमगांव<br>7.मेंढेपठार(रिठी)<br>8.जांभळापाणी<br>9.सुरजपूर (रिठी)<br>10.तांबेखणी (मा) | (1) | अराखीव (खुला) महीला) |
| 12. | 11-चांपा | 1.चांपा<br>2.मांगली<br>3.डवलीमेट (रिठी)<br>4.खापरी कुरुडकर<br>5.मांजरी (रिठी)<br>6.उंदरी | (1) | भ.ज.(ड) |
| 13. | 35-सिर्सी | 1.सिर्सी | (1) | अनु.जमाती.(महीला) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 14. | 21-गांगापूर | 1.गांगापूर<br>2.घोट्टुर्ली<br>3.बोरीभटारी(रिठी)<br>4.नरसाळा (रिठी)<br>5.हातकवडा (रिठी)<br>6.ठोंबरा<br>7.राजूरवाडी | (1) | अराखीव (खुला) |
| 15. | 13-बोथली | 1.बोथली<br>2.खैरी कलार<br>3.मरजघाट(रिठी)<br>4.बेंदोली<br>5.ठाणा पाद्री | (1) | भ.ज. (ब) |
| 16. | 17-मकरधोकडा | 1.मकरधोकडा<br>2.बोपेश्वर | (1) | इ.मा.व. |
| 17. | 25-चारगांव | 1.चारगाव<br>2.पिटीचूवा<br>3.मरमझरी(रिठी)<br>4.रिधोरा(रिठी)<br>5.किन्हाळा(दे.)<br>6.जामगड<br>7.खैरी (बु)<br>8.सिंदीविहीरी | (1) | भ.ज.(क.) |
| 18. | 11अ-चिमणाझरी | 1.चिमणाझरी<br>2.पेंढरी<br>3.तिखाडी<br>4.सालईमेंढा<br>5.सुकळी (पेंढरी)<br>6.उमरा | (1) | अराखीव (खुला) (महीला) |
| 19. | 14-डव्हा | 1.डव्हा<br>2.वाघोली(रिठी)<br>3.खापरी डव्हा(रिठी)<br>4.थारा<br>5.फुकेश्वर<br>6.म्हसेपठार (रिठी)<br>7.दुधा | (1) | आ.द.घ. |
| 20. | 28-बेला | 1.बेला | (1) | अराखीव (खुला) |

## कोतवाल पदासाठी किमान आवश्यक अर्हता

1) अर्जदार हा 4 थी पास असावा.

2) अ) वयोमर्यादेकरीता अर्जदाराचे वय हे जाहीरनामा प्रसिध्द केल्याचा दिनांकापासुन विचारात घेतले जाईल म्हणजेच दिनांक. 08/06/2023 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.

ब) अर्जदाराचे वय दिनांक.08/06/2023 रोजी 18 वर्षापेक्षा कमी नसावे 40 वर्षापेक्षा जास्त नसावे.या

साठी पूरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला, जन्मप्रमाणपत्र, पॅन कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स यापैकी कोणतेही एक पूरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

क) कोतवाल पदाकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.

3) अर्जदार हा साझ्या अंतर्गत गावातील रहिवासी असणे आवश्यक आहे. त्यासाठी पूरावा म्हणून घर टॅक्स पावती,राशन कार्ड, निवडणूक ओडखपत्र, आधार कार्ड, पॅन कार्ड, मनरेगा अंतर्गत जॉब कार्ड यापैकी कोणतेही एक पूरावा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

4) मागास प्रवर्गासाठी आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

5) इतर मागास प्रवर्ग , विशेष मागास प्रवर्ग वि.जा.अ,व भ.ज.ब, क,ड प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2023-2024 कालवधीकरीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट ( क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे ( नॉन क्रिमिलेअर ) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

6) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, वि.जा.अ, व.भ.ज.ब.,क,ड प्रवर्गातील महीला पदांसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदार यांना सन 2023-2024 कालवधीकरीता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट ( क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे ( नॉन क्रिमिलेअर ) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

7) अर्जदार शारिरीक दृष्या सक्षम असावा. नियुक्ती नंतर जिल्हा मेडीकल बोर्डचे चिकीत्सक प्रमाणपत्र एक महिन्याच्या आत उमेदवाराला सादर करावे लागेल.

8)अर्जदाराचे चारीत्र निष्कलंक असणे आवश्यक आहे.त्यासाठी उमदवाराने नियुक्तीनंतर संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांचे प्रमाणपत्र एक महिण्याच्या आत सादर करावे अन्यथा नियुक्ती रदद करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

9) महाराष्ट्र राज्यसेवा ( लहान कुटुंबातील प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 मधील लहान कुटूंबाचे अर्हता धारण करणे आवश्यक ( अर्जदारा यांची अर्हता दिनांकास 2 पेक्षा जास्त अपत्य नसावे )

**परिक्षेचे स्वरूप**

| अनु क्र | पदनाम संवर्ग | परीक्षेचे गुण | |
|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | एकुण गुण |
| 1 | कोतवाल | 50 प्रश्ने | 100 |

**लेखी परीक्षेच्या प्रश्न पत्रिकेचे स्वरूप साधारणपणे खालीलप्रमाणे राहील.**

1.कोतवाल पदाची लेखी परीक्षा 100 गुणांची असेल प्रत्येक प्रश्न 2 गुणाचा राहील.

2.लेखी परिक्षेची प्रश्न पत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाची असेल .

3.सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिम/ 2010/2009 /प्र.क्र.66 /10/13 अ दिनांक.16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेते वेळी उत्तरपत्रिकेवर उत्तर लिहण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त **काळया शाईचा बॉलपेन वापर करावा लागेल.**

# निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती

1) लेखी परीक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल.नियुक्तीच्या वेळी मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी लागतील, अन्यथाअंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.

2) लेखी परिक्षा, कागद पत्रे छाननी इत्यादी करीता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सुचना तहसिल कार्यालय उमरेड च्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द होतील.

3) अंतिम निवड करतांना पात्र अर्जदारांचे जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता सादर करावे लागतील. ज्या अर्जदाराची जाहीरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती कागदपत्रांच्या आधारे परिपुर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा अंतिम निवड करतांना विचार करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केलेली संपुर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कांगदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

4) अर्जदारांचे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा.

5) अर्जदार संबंधीत साझाचा व साझ्याअंतर्गत समाविष्ट गावामधील स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

6) अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा.

7)प्रत्येक साझ्यात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसारआरक्षित करण्यात आलेलेआहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासूनअर्ज करावा. ( आरक्षण व्यतिरीक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.)

8) संपूर्ण भरती प्रक्रीया साझानिहाय होणार असून कोणत्याही दोन साझ्यांच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

9) कोतवाल हे पद वर्गीकृत नाही.

10) कोतवालांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्तीही शारीरिक दृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे.

11) इ.मा.व, वि.मा.प्र, वि.जा.अ, भ.ज.ब, भ.ज.क, भ.ज.ड. प्रवर्गातील उमेदवाराने **दिनांक-३१/०३/२०२४ पर्यंत किंवा त्यानंतर वैध असलेले नॉन क्रिमीलेअरचे सक्षम प्राधिकारी** यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र, कागदपत्र अर्जासोबत जोडणे आश्यक आहे.

12) शासन महिला व बाल विकास विभागाकडील निर्णय क्र.८२/२००१/मसेआ/२०००/प्र.क्र.४१२/का-२ दि.२५/०५/२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, वि.जा.-अ.बभ.ज.- ब, क, ड प्रवर्गातील महिला आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला अर्जदारांनी सन **२०२३-२४** या कालावधी करीता दि. **३१/०३/२०२४ पर्यंत वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यकती व गट ( क्रिमिलेअर)** यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

13) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२००० दिनांक 28/03/2005 व क्र. एसआरव्ही- 2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्तच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांने ही विहीत ( अ ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

14) लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे अंतिम निवड यादी तयार केली जाईल.मुलाखत राहणार नाही.

15) उमेदवारांना लेखी परिक्षेला उपस्थित राहण्यासाठी प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.

16) परिक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील अश्या उमेदवाराच्या गुणवत्ता क्र म सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक.27 जुन,2008 मधील नियमानुसार क्रम लावला जाईल.

17) परिक्षा शुल्क :- उमेदवारांनी खालीलप्रमाणे परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

| प्रवर्ग | खुल्या प्रवर्गातील उमेदवारासाठी | मागास वर्गातील उमेदवारासाठी |
|---|---|---|
| परिक्षा शुल्क | रूपये 300/- | रूपये 200/- |

18) उक्त परिक्षा शुल्क ना परतवा असेल .

19) परिक्षा शुल्क हे रोख स्वरूपात तहसिलदार उमरेड यांचे कडे जमा करावे लागेल.

20) जाहीरात प्रसिध्द होण्यापूर्वी ज्या उमेदवारांनी कोतवाल पदासाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केला असतील तर ते सर्व अर्ज रदद झाले आहे असे समजण्यात येईल.

स्वा—
( संदीप पुंडेकर)
तहसिलदार, उमरेड
सदस्य सचिव,कोतवाल
पदभरती प्रक्रीया समिती उमरेड -2023

**प्रतिलीपी :-**

1) मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना माहितीकरीता सविनय सादर.

2) गटविकास अधिकारी ,उमरेड यांनी सदरच्या जाहीरनाम्याची प्रत आपले कार्यालयाचे नोटीस बोर्डावर दर्शनी भागात प्रसिध्द करुन प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास समक्ष सादर करावा.

3) तलाठी यांना तलाठी कार्यालयात प्रसिध्द करण्याबाबत व गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायतीचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्याबाबत सुचना देवून प्रसिध्द केल्याचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

4) निवड नस्ती.

( संदीप पुंडेकर)
तहसिलदार, उमरेड
सदस्य सचिव,कोतवाल
पदभरती प्रक्रीया समिती उमरेड -2023